संपुर्ण महाराष्ट्रात वितरीत होणारे एकमेव मराठी वृत्तपत्र

# जागृत शोध



JAGRUT SHODHA

RNI.Reg.No.MAHMAR/2009/37305


वर्ष-१९ | अंक १७ | सोमवार ६ जुलै २०२६ | संपादक-भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर मो.नं.८००७०७२८२८ | पृष्ठे ४ | मुल्ये २/-

संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा प्रतिनिधी व तालुक्यात तालुका प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ८००७०७२८२८

## ठळक घडामोडी

## गुड न्यूज!

### आता महाराष्ट्र शासनाचे थेट अपडेट्स मिळणार 'व्हॉट्सअॅप' चॅनल आणि 'पब्लिक अॅप' वर!




जागृत शोध

मुंबई,: समाजमाध्यमांच्या विविध प्लॅटफॉर्म्सद्वारे नागरिकांपर्यंत अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती पोहोचविणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने आता 'व्हॉट्सअॅप' चॅनल आणि 'पब्लिक' अॅप वर अधिकृत, प्रमाणित खाती सुरू केली आहेत. आता नागरिक 'व्हॉट्स अॅप' चॅनलवर DGIPR, Govt of Maharashtra या नावाने, तर पब्लिक अॅपवर महाराष्ट्र शासन या नावाने शासकीय घडामोडींचे थेट अपडेट्स मिळवू शकतील. या दोन्ही प्लॅटफॉर्म्समुळे जनतेपर्यंत अधिक गतीने, अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती थेट आणि व्यापक स्वरूपात पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे.शासन आणि जनतेला जोडणारा महत्त्वाचा दुवा आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाचे संपूर्ण समन्वयन करणारी यंत्रणा म्हणून माहिती वजनसंपर्क महासंचालनालयाची ओळख आहे. शासनाचे विविध लोकोपयोगी उपक्रम, योजना जनतेपर्यंत पोहोचविणे आणि त्याबाब तच्या जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचविण्याची दुहेरी जबाबदारी महासंचाल नालय पार पाडत असते. हे काम करताना डिजिटल क्रांतीचा पुढचा टप्पा म्हणून महासंचालनालयाने हायपर लोकल कंटेंट देणाऱ्या 'पब्लिक अॅप' वर आणि 'व्हॉट्सअॅप चॅनल' वर आपली उपस्थिती नोंदवली आहे.

# देहू आळंदीतून पालखी पुण्यात येणार?

## वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्र्यांचं महत्त्वाचं आवाहन, वारकरी ऐकेनात!

जागृत शोध

पुणे : आषाढी वारी २०२६ मधील मानाच्या पालख्यांचे प्रस्थान अवघ्या काही तासांवर आले आहे. श्री संत तुकाराम महाराज पालखीचे प्रस्थान ७ जुलै रोजी देहू येथून पंढरपूरकडे होईल, तर श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान ८ जुलै रोजी आळंदी येथून होईल. तत्पूर्वी हवामान विभागा च्या अंदाजानुसार पुणे जिल्ह्यात सर्वत्र पावसाचा धुमाकूळ सुरू आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी २०० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडला आहे. आळंदी देहूतील अनेक पुल पाण्याखाली गेले आहेत. याच पार्श्वभूमीवर वारकऱ्यांनी देहू आळंदीला येऊ नका, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. मात्र मुख्यमंत्र्यांचे आवाहन





धुडकावून लावत आम्ही देहू आळंदीला जाणारच, असा पवित्रा वारकऱ्यांनी घेतला आहे.मुंबई वेधशाळा हवामान अंदाजा नुसार पुणे जिल्ह्यात दिनांक ०६/०७/२०२६ रोजी रेड अलर्ट दिला असून त्याप्रमाणे देहू व आळंदी परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. त्यामुळे सदर परिसरातील पाणी साठा वाढला आहे. श्री संत तुकाराम महाराज व श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे पालखी प्रस्थान अनुक्रमे दिनांक ०७ आणि ०८ जुलै रोजी देहू आणि आळंदी येथून होणार आहे. तरी सुरक्षतेच्या दृष्टीने पालखी सोहळयात पुणे महानगर पालिकेच्या हद्दी अथवा त्या पुढे पासून सहभागी व्हावे, असे जिल्हा प्रशासनाकडून सर्व वारकरी, भाविक व नागरिकांना सूचना देण्यात येत आहे. याबात सर्वांनी सयंम बाळगून जिल्हा प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी पुणे यांचे वतीने करण्यात येत आहे

## दोन दिवसांवर पालखीः अन इंद्रायणीने ओलांडली धोक्याची पातळी; चारही पूल पाण्याखाली

जागृत शोध

राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आळंदीतील इंद्रायणी नदीने धोक्याची पातळी ओलांडत रौद्ररूप धारण केले आहे. नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाल्याने आळंदीतील चारही पूल पूर्णपणे पाण्याखाली गेले असून, परिसरात पूरस्थिती निर्माण झाली आहे.पुराच्या पाण्याचा वेग इतका प्रचंड आहे की, पुलांवरील काही वीज खांब (लाईट पोल) देखील कोसळल्याची घटना घडली आहे. नदीकाठावरील अनेक दुकाने पुराच्या पाण्यात वाहून गेल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.दरम्यान, इंद्रायणी नदीला आलेल्या



महापुरामुळे भक्त पुंडलिक मंदिर पूर्णपणे पाण्याखाली गेले आहे. तसेच, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिराच्या महाद्वाराच्या पायऱ्यांपर्यंतही पुराचे पाणी पोहोचले असून, भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.विशेष म्हणजे, अवघ्या दोन दिवसांनंतर श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. त्यापूर्वीच निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. वारकऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात असून, नदीकाठी जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.दरम्यान, परिस्थितीवर जिल्हा प्रशासन, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सातत्याने लक्ष ठेवून असून, पावसाचा जोर कायम राहिल्यास आणखी खबरदारीच्या उपाययोजना राबवण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## शनैश्वर देवस्थान अॅप घोटाळा चौकशी प्रकरणी ८ आठवड्यात निर्णय घेण्याचे आदेश

जागृत शोध

शनिशिंगणापूर:श्री शनैश्वर देवस्थान मधील कथित गैर व्यवहाराच्या (अॅप घोटाळा) चौकशी संदर्भातील ८ आठ वड्यात निर्णय घेण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकारला दिले असल्याची माहिती याचिकाकर्ते सचिन दरंदले यांनी दिली. घोटाळेबाजांवर कारवाई कधी होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हा निर्णय घेण्यापूर्वी याचिकाकर्ते सचिन प्रभाकर दरंदले यांना वैयक्तिक सुनावणीची संधी देण्याचेही न्यायालयाने म्हटले आहे.सोनई येथील याचिकाकर्ते सचिन दरंदले यांनी २२ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्र्याकडे सादर केलेल्या निवेदनात शनैश्वर देवस्थानातील कथित आर्थिक गैरव्यवहार,




बनावट पूजा, बनावट पावती बुक, क्यूआर कोड, व्यवहारातील अनियमितता, बनावट पावती पुस्तके, अतिरिक्त कर्मचारी भरती, तसेच मागील दहा वर्षाच्या आर्थिक व्यवहाराची सीबीआय मार्फत चौकशी व स्वतंत्र लेखा परीक्षणाची मागणी केलेली होती, मात्र त्यावर काहीही निर्णय न झाल्याने दरंदले यांच्यावतीने अॅड. उमाकांत वाघ यांनी खंडपीठात जनहित याचिका दाखल केली. त्यावर न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी व न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे यांच्या खंडपीठांसमोर सुनावणी होऊन सरकारला ८ दिवसात या गैरव्यवहाराबाबत निर्णय घेण्याचे सुचित केलेले आहे. याचीका कर्त्यांनी जमा केलेली पाच लाख रुपये रक्कम व्याजासह परत करण्याचे आदेश देण्यात आले आहे. राज्य सरकारच्या मुख्य सचिवांना येत्या आठवड्यात दरंदले यांच्या निवेदनावर निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. याचिकाकर्ते सचिन दरंदले यांच्या बाजूने अॅड. उमाकांत वाघ यांनी तर सरकारी पक्षाकडून सरकारी वकील एन. एस. टेकाळे यांनी बाजू मांडली.

## एक पाऊस पडलाय अन महाराष्ट्र पूर्णपणे पॅरालिसिसि झाल्याचे चित्र, सुप्रिया सुळेंचा सरकारावर हल्लाबोल; तातडीने आढावा घेऊन आणीबाणी जाहीर करण्याचीही मागणी

जागृत शोध




खरं तर मला विश्वासच बसत नाही कि ज्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा इतका गांजावाजा करत कार्यक्रम झाला, ज्यामुळे अर्धा तास सगळ्यांचा वाचत होता, त्यामुळे सगळ्यांनीच त्याचे कौतुक केलं. सध्या कॉस्टमध्ये पडायला नको कारण तो वेगळा विषय आहे. मात्र ज्या पद्धतीने मिसिंग लिंकचे व्हिडीओ येतोय हे अतिशय चिंताजनक आहे. राज्यात या पूर्वीही पाऊस झाला आहे. मुंबई-पुण्याला पाऊस नवा नाही. पण असं चित्र पूर्वी नव्हतं. हे कदाचित पहिल्यांदाच पाहायला मिळत असून हे अतिशय चिंताजनक असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी तातडीने आढावा घेऊन राज्यात आणीबाणी जाहीर करावी. महाराष्ट्राचे नेमकं चित्र काय? यावर देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य करणं अतिशय आवश्यक असल्याचेही त्या म्हणाल्या. राज्यात एक पाऊस पडलाय आणि महाराष्ट्र पूर्णपणे पॅरालिसिसि झाल्याचे चित्र सर्व माध्यमांमधून दिसत आहे. असे देखील खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्यासध्या उर्वरित महाराष्ट्रातही अशीच परिस्थिती आहे. मुंबईतील मानखुर्द भागात एका तीन मजली चाळीचा भाग कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. त्यात ६ लोकांचा मृत्यू झालाय. तर कुठे झाडं कोसळताय. त्यामुळे महाराष्ट्रात नेमकं चाललंय तरी काय? हा प्रश्न आहे. राज्यात या पूर्वीही पाऊस झाला आहे. पण असं चित्र पूर्वी नव्हतं. हे कदाचित पहिल्यांदाच पाहायला मिळत असून हे अतिशय चिंताजनक आहे. मी राज्यातील सगळ्यांना विनंती करते कि या दिवसात शक्य तितका प्रवास टाळावा. तर दुसरीकडे माझी आग्रही मागणी आहे की महाराष्ट्रातील सर्व पायाभूत सुविधांची पारदर्शक चौकशी झाली पाहिजे. या सगळ्या प्रकाराला मी करप्शन म्हणणार नाही. कारण की त्या संदर्भात अद्याप माहिती आलेली नाही. मात्र या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये एकूण किती खर्च झाला, सेफ्टी संदर्भात ऑडिट झाला का, आणि जर झाला असेल तर यात नैसर्गिक आपत्ती संदर्भात विचार केला की नाही? सर्व प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्र सरकारला द्यावी लागणार, असे देखील सुप्रिया सुळे म्हणाल्या.सुरक्षेबद्दल नेमकं कोण विचार करतंय? महाराष्ट्रात इतक्या मोठ्या प्रमाणावर इन्फ्रास्ट्रक्चर होत असल्याचे सांगणार सरकार त्यात जर सुरक्षितता आणि पर्यावरणाचा विचार होणार नसेल तर या सर्वांचा काय उपयोग? एक पाऊस पडलाय आणि महाराष्ट्र पूर्णपणे पॅरालिसिसि झाल्याचे चित्र सर्व माध्यमांमधून दिसत आहे. असे देखील खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या.आज तुम्ही पुण्याच रेल्वे स्थानक, एसटी बस आगार बघा, हे समजू शकतो. मात्र मुंबई-पुणे यांच्यातील कनेक्टिव्हिटी अतिशय महत्त्वाची असून ही कनेक्टिव्हिटी बंद होणं, हे धक्कादायक आहे. मुंबईत अधिवेशन सुरू असताना आमदार तेथे पोहोचतील की नाही ही परिस्थिती आहे. जर आमदार निघाले नसतील तर माझी त्यांना विनंती आहे की रिक्स घेऊन घराबाहेर पडू नका. लोकप्रतिनिधी आमदार,खासदार जर पोहचू शकत नसतील तर सर्वसामान्य माणसांचं काय? मुंबई-पुणेला जोडणाऱ्या तीन मार्ग असून तीनही सध्यामी महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना विनंती आहे की या दिवसात शक्य तेवढा प्रवास टाळावा. तर दुसरीकडे माझी आग्रही मागणी आहे की महाराष्ट्रातील सर्व इनफास्ट स्ट्रक्चरची पारदर्शक चौकशी झाली पाहिजे. सगळ्या प्रकाराला करप्शन म्हणणार नाही कारण की त्या संदर्भात अद्याप माहिती आलेली नाही. मात्र या इनफा स्ट्रक्चर मध्ये एकूण किती खर्च झाला, सेफ्टी संदर्भात ऑडिट झाला का, आणि जर झाला असेल तर या नैसर्गिक आपत्ती संदर्भात विचार केला की नाही? सर्व प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्र सरकारला द्यावी लागणार असे देखील सुप्रिया सुळे म्हणाल्या.घडीला बंद असल्याचे चित्र असून अशी परिस्थिती चिंताजनक असल्याचेही खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## राम मंदिर लुटणाऱ्यांना हिंदूः; रामरक्षा आंदोलनात उद्धव ठाकरेंची सडकून टीका, नेमकं काय म्हणाले?

जागृत शोध




मुंबई :अयोध्येतील राम मंदिरात झालेल्या कथित आर्थिक गैरव्यवहाराविरोधात आज मुंबईतील दादर येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून 'रामरक्षा आंदोलन' करण्यात आले. यावेळी दादरच्या ऐतिहासिक हनुमान मंदिरात महाआरती करण्यात आली. या आंदोलनाला शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे खासदार संजय राऊत, आमदार आदित्य ठाकरे आणि मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यासह हजारो शिवसैनिक उपस्थित होते.आपण कडवट हिंदू आहोत, पण मूर्ख नाही - उद्धव ठाकरे यावेळी दादर येथील उपस्थितांना संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी मंदिराच्या दानाची चोरी करणाऱ्यांवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, ङ्गआपण कट्टर, कडवट हिंदू आहोत. आम्ही हिंदू भोळे-भाबडे आहोत, पण मूर्ख नाहीत. आपल्या हिंदुत्वाचा गैरफायदा घेऊन कोणी मंदिर लुटत असेल तर 'अब हिंदू माफ नही करेगा'. देशाची सत्ता मिळवण्यासाठी 'जय श्रीराम' आणि 'मंदिर वही बनायेंगे' अशा घोषणा दिल्या गेल्या. मात्र, राम मंदिरासाठी शिवसैनिकांनी जेवढे काम केले, तितके काम दुसऱ्या कोणीही केलेले नाहीङ्घ, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले.बाबरी ते मुंबई दंगल अनब बाळासाहेबांच्या योगदानाचा उल्लेख आपल्या भाषणात उद्धव ठाकरे यांनी राम मंदिर आंदोलनातील शिवसैनिकां च्या आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या योगदानाचा प्रामुख्याने उल्लेख केला. ते म्हणाले की, ङ्गशिलापूजन, रथयात्रा आणि अयोध्येतील कारसेवेत शिवसैनिकांनी सक्रिय सहभाग घेतला. अनेक कारसेवकांनी आपले रक्त सांडले, अनेकांचे जीव गेले. बाबरीच्या घटनेनंतर मुंबईने दंगली आणि बॉम्ब स्फोटांचा भीषण काळ भोगला. त्या कठीण काळात हिंदू आक्रमित आणि भयग्रस्त असताना, त्यांच्या पाठीशी उभा राहणारा एकच मर्द नेता होता, तो म्हणजे हिंदुहृदयसम्राट बाळा साहेब ठाकरे. त्यांनीच हिंदूंच्या हातात शिवसेनेचा भगवा दिला. ज्या व्यक्तीला पंतप्रधान करण्यासाठी आपण १२ वर्षे मेहनत केली, त्यांनीच आता शिवसेनेला संपवण्यासाठी 'अफजल खानी विडा' उचलला आहे. त्यांना हिंदुत्वाचा केवळ गैरफायदा घ्यायचा आहे. मात्र, सत्ताधाऱ्यांना समोर उभे राहून निधड्या छातीने प्रश्न विचारण्याची धमक फक्त शिवसेनेमध्येच आहे, असेही उद्धव ठाकरेंनी स्पष्टकेले.

cmyk

# थोडक्यात

## कोरेगाव भीमात टेम्पोच्या धडकेत इसमाचा मृत्यू

जागृत शोध

(शिक्रापूर प्रतिनिधी) कोरेगाव भीमा ता. शिरूर येथील कल्याणी फाटा येथे बालाप्रसाद लच्चीराम पांडे या इसमाचा टेम्पोच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अज्ञात टेम्पोचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोरेगाव भीमा ता. शिरूर येथील कल्याणी फाटा येथे इंडियन ऑइल पेट्रोल पंपाजवळ बालाप्रसाद पांडे हे रस्ता ओलांडत असताना शिरूर बाजूने पुण्याच्या दिशेने भरधाव वेगाने आलेल्या एम एच १२ वाय बी ३८११ या टेम्पोची बाल प्रसाद यांना जोरदार धडक बसून अपघात होऊन बालाप्रसाद गंभीर जखमी झाले, दरम्यान नागरिकांनी बालप्रसाद यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी बालाप्रसाद लच्चीराम पांडे वय ७४ वर्षे रा. शिंदे पार्क सणसवकोरेगाव भीमा ता. शिरूर येथील कल्याणी फाटा येथे इंडियन ऑइल पेट्रोल पंपाजवळ बालाप्रसाद पांडे हे रस्ता ओलांडत असताना शिरूर बाजूने पुण्याच्या दिशेने भरधाव वेगाने आलेल्या एम एच १२ वाय बी ३८११ या टेम्पोची बालप्रसाद यांना जोरदार धडक बसून अपघात होऊन बाला प्रसाद गंभीर जखमी झाले, दरम्यान नागरिकांनी बालप्रसाद यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी बालाप्रसाद लच्चीराम पांडाडी ता. शिरूर जि. पुणे याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले, घडलेल्या प्रकाराबाबत प्रमोद एकनाथ राठोड वय २६ वर्षे रा. विठ्ठल नगरी कोरेगाव भीमा ता. शिरूर जि. पुणे, मुळ रा. केकत पांगरी ता. गेवराई जि. बीड यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी एम एच १२ वाय बी ३८११ या टेम्पो वरील अज्ञात चालकावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार अजित इंगवले हे करत आहे.

## प्राचार्य सीताराम गोसावी यांचे निधन

जागृत शोध

शिरूर : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ज्येष्ठ कार्यकर्ते, पुरोगामी विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य सीताराम गोसावी (वय ७०) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक आणि पुरोगामी चळवळीमध्ये शोककळा पसरली असून सर्व स्तरांतून हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांनी देहादान केले. त्यांच्या पश्चात पत्नी प्रा. सीमा गोसावी, दोन मुले, तीन मुली, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. शिरूर येथील चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयातील मराठी विभागाच्या प्राध्यापिका तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा शिरूरच्या कार्याध्यक्षा व रसिक विचार मंचच्या सदस्या प्रा. डॉ. क्रांती पैठणकर यांचे ते वडील होत. प्राचार्य गोसावी यांनी आयुष्यभर शिक्षण, विवेकवाद आणि सामाजिक परिवर्तनासाठी कार्य केले. सोलापूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयासहऔंध, शिरवळ, मलकापूर, पंढरपूर, अशा विविध महाविद्यालयात उपक्रमशील प्राचार्य म्हणून २० वर्ष उल्लेखनीय सेवा बजावली आहे. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले. विशेषतः ग्रामीण, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थिनींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सोलापूर शहर शाखेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद आणि सामाजिक प्रबोधनाची चळवळ तळागाळा पर्यंत पोहोचवली. त्यांच्या अभ्यासपूर्ण व्याख्यानां मुळे आणि स्पष्टवक्तेपणामुळे ते राज्यभर प्रसिद्ध होते. प्राचार्य गोसावी यांच्या निधनाची वार्ता समजताच शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला. त्यांच्या कार्याची परंपरा आणि समाजप्रबोधनाचा वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. त्यांच्या निधनाने विवेकवादी चळवळीतील एक अभ्यासू, संवेदनशील आणि कर्तृत्ववान नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

# गौण खनिज उत्खननासाठी अल्प मुदतीच्या परवान्याबाबत

## उप विभागीय अधिकारी व तहसीलदारांना कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

जागृत शोध

पुणे, : महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ५८ व ५९ अन्वये अल्प मुदतीचे परवाने तहसील दार यांच्या स्तरावरून देतांना महसूल व वन विभागाच्या १९ मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहे. गौण खनिज उत्खननासाठी तात्पुरते परवाने मिळवण्या करीता तहसिलदार यांचेकडे अर्ज प्राप्त झाल्यास सदर सर्व्हे कमांक, गट क्रमांक हा नियम ५८ अन्वये जिल्हा खाणकाम योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे किंवा कसे यांची त्यांनी खात्री करावी व त्यानंतरच पुढील कार्यवाही करावी. अल्प मुदतीचे, तात्पुरते परवाने हे जिल्हा खाणकाम योजनेत नियम ५८ अन्वये समितीच्या मान्यते अंती समावेश केला असेल केवळ अशा क्षेत्रावर देण्यात (स. नं./ग.नं.) यावेत. समावेश करण्यासाठी प्रस्तावित अथवा विचाराधीन असलेल्या क्षेत्रावर किंवा ज्या क्षेत्रावर खाणपट्टा मंजूर करण्यात आलेला आहे अशा क्षेत्रावर अल्प मुदतीचे, तात्पुरते परवाने देण्यात येवू नयेत. तसेच समितीने एखाद्या विभागाची ना-हरकत प्राप्त करून घेण्याच्या अधीन राहून मान्यता दिली असल्यास हे ना-हरकत प्राप्त झाल्याशिवाय अल्प मुदतीचे तात्पुरते परवाने देण्यात येऊ नयेत. तहसिलदार यांना महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनि यमन) नियम, २०१३ मधील तरतूदी नुसार ५०० ब्रास परिमाणापर्यंत गौण खनिजाचे अल्प, तात्पुरते परवाने देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. एखाद्या कामासाठी किंवा प्रकल्पासाठी संपूर्ण वर्षासाठी जेवढे गौण खनिज आवश्यक आहे, त्या गौण खनिजाचे एकत्रित परिमाण विचारात घ्यावे. तसेच एखाद्या व्यक्तीस किंवा संस्थेस वारंवार गौण खनिजाचे अल्प, तात्पुरते परवाने आवश्यक असतील तर त्याकरीता वर्षभरात आवश्यक असलेल्या एकूण गौण खनिजाचे परिमाण विचारात घ्यावे. अशा प्रकारे वर्षभराचे परिमाण निश्चित केल्यानंतर गौण खनिजाचे अल्प किंवा तात्पुरते परवान्याचे परिमाण ५०० ब्रासपेक्षा अधिक होत असल्यास त्यानुषंगाने अल्प, तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही करण्यासाठी परिमाणानुसार अधिकारीता असलेल्या जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करावा. तहसिलदारांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी अल्प किंवा तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही करावी. तथापि, एखाद्या व्यक्तीस अथवा संस्थेस परिमाणानुसार अधिकारीता असलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने (जिल्हाधि कारी, उपविभागीय अधि कारी) थेट अर्ज करण्याची मुभा असेल. अल्प मुदतीच्या परवान्यांसाठी जे क्षेत्र (सर्व्हे कमांक, गट क्रमांक) जिल्हा खाणकाम योजनेत समाविष्ट करण्यात आले आहेत, अशा क्षेत्रातून तहसीलदार यांनी एका वर्षामध्ये एकदाच अल्प, तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही करावी. मात्र एखाद्या शेतकरी, गावकरी यांना विहीर बांधकाम किंवा घराच्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ मध्ये नमूद करण्यात आलेल्या मर्यादित मुरूम, माती गौण खनिजासाठी अल्प, तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही तहसिलदार यांना त्यांच्या अधिकारात करता येईल. पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या वडार व कुंभार समाजाच्या अधिकृत व्यक्तींना प्रचलीत नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या त्यांच्या करिताच्या वार्षिक मर्यादेत गौण खनिज उत्खननासाठी अल्प किंवा तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही तहसिलदार यांनी करावी. अल्प किंवा तात्पुरत्या परवानाद्वारे कोणत्याही वेळी खड्याची पृष्ठभागापासूनची खोली सहा मीटर (६ मीटर) पेक्षा अधिक असणार तसेच शासकीय जमिनीवर खनिपट्टे जाहीर लिलावा किंवा लिलावाव्दारे देण्यात येणारे असल्याने शासकीय जमिनीवर (पारंपारिक कुंभार व वडार समाजाचे व्यक्तीस नियमानुसार वगळून) इतरत्र अल्प किंवा तात्पुरते परवाने दिले जाणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. तहसीलदारांनी त्यांच्या संबंधित अधिकारितेच्या हद्दीतील ज्या क्षेत्रातून (गट क्रमांक किंवा सर्व्हे क्रमांक) ५०० ब्रासपेक्षा अधिक नसतील एवढ्या प्रमाणात गौण खनिज उत्खननाची वार्षिक मुदत संपल्यानंतर ई.टी.एस. मोजणी करून त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा व जास्तीचे उत्खनन झाले असल्यास जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार स्वामित्वधन भरून घेण्याची कार्यवाही अथवा दंडात्मक कारवाई करावी. (सक्षम प्राधिकारी यांनी त्यांच्या अधिकारितेच्या हद्दीतील ज्या क्षेत्रातून (गट क्रमांक किंवा सर्व्हे क्रमांक) उत्खननास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यांनुषंगाने वर्षातून एकदा ई.टी.एस. मोजणी करुन मोजणीच्या अनुषंगाने अतिरिक्त उत्खनन आढळल्यास ७ दिवसाच्या आत खाण पट्टा धारकांना अतिरिक्त उत्खननाचे स्वामित्व धनाची रक्कम भरण्याची सूचना देण्यात यावी. स्वामित्व धनाची रक्कम ३० दिवसाच्या आत जमा करून घ्यावी. ३० दिवसात रक्कम जमा न केल्यास पुढील ७ दिवसात दंडात्मक कारवाई करण्यात येवून दंड वसूल करण्यात यावा. परवान्यांची मुदत संपल्यानंतर उत्खनन क्षेत्राची खड्डयांचे संदर्भाने आवश्यक सुरक्षात्मक उपययोजना करणे व त्याचे अनुपालन अहवाल सादर करण्याची जबाबदारी संबंधित परवानाधारकावर निश्चित करावी. गौण खनिजाचे उत्खनन व वाहतुकीकरीता शासन वेळोवेळी निश्चित करेल त्या संगणक प्रणालीचा वापर करणे अनिवार्य राहील. या सूचना जशाच्या तशा उपविभागीय अधिकारी यांना देखील लागू आहे. याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तहसीलदार अथवा उप विभागीय अधिकारी यांच्याकडून अंमलबजावणी करण्यास कसूर केल्यास करणाऱ्या संबंधितां विरुध्द शिस्त भंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, अधिक माहितीकरिता शासन निर्णयाचे बारकाईने अवलोकन करुन कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डुडी यांनी दिल्या आहेत.

# शिरूर तालुक्यातील २२३ शिक्षक पदे तातडीने भरा; सामाजिक कार्यकर्त्याचा शासनाला इशारा

जागृत शोध




शिरूर : शिरूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत तब्बल २२३ शिक्षक पदे रिक्त असल्याचा दावा करत ही पदे तातडीने भरण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा व्हिसलब्लोअर निलेश मंदा यशवंत वाळुंज यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री, ग्रामविकासमंत्री, मुख्य सचिव, शिक्षण आयुक्त, पुणे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) तसेच अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ई-मेलद्वारे निवेदन पाठवून केली आहे. मागण्यांची दखल न घेतल्यास मंत्रालयासमोर शांततापूर्ण सामाजिक आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. वाळुंज यांनी निवेदनात म्हटले आहे की, शिरूर तालुक्यात उपशिक्षकांची १२८, पदवीधर शिक्षकांची ८३ आणि मुख्याध्यापकांची १२ अशी एकूण २२३ पदे रिक्त आहेत. तालुक्यात ३५२ शाळा कार्यरत असून २०२५ मध्ये दोन शाळा बंद झाल्याचे समजते. शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत असून ही बाब भारतीय राज्यघटनेतील शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराशी संबंधित असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रश्नाबाबत जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक) संजय नाईकडे तसेच जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्याशी दूरध्वनी आणि व्हॉट्सअॅपद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. सामाजिक प्रश्नांबाबत प्रशासनाकडून संवादाचा अभाव असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. निवेदनात रिक्त शिक्षक पदे तातडीने भरणे, ग्रामीण शाळांसाठी कालबद्ध कृती आराखडा जाहीर करणे, भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पर्यायी व्यवस्था करणे, शिक्षक भरती व रिक्त पदांची अद्ययावत माहिती सार्वजनिक करणे आणि सरकारी शिक्षण व्यवस्थेवरील पालकांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष न दिल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांच्या संरक्षणासाठी लोकशाही मार्गाने मंत्रालय, मुंबई येथे शांततापूर्ण सामाजिक आंदोलन छेडण्याचा इशाराही वाळुंज यांनी निवेदनातून दिला आहे.

# शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीची होणारी निवडणूक

## न्यायालयाने रद्द करत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया नव्याने राबविण्याचे दिले आदेश

जागृत शोध




शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीची ५ जुलै रोजी होणारी निवडणूक न्यायालयाने रद्द करत संपूर्ण निवडणूक प्रक्रिया नव्याने राबविण्याचे आदेश दिले आहेत. ग्रामपंचायत मतदारसंघातील मोठ्या संख्येने सदस्यांचा मतदार यादीत समावेश न झाल्याच्या याचिकेवर सुनावणी करत न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. या निर्णयाची माहिती माजी आमदार अशोक पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. सुमारे नऊ वर्षांनंतर बाजार समितीची निवडणूक होत असून, आमदार माऊली कटके आणि माजी आमदार अशोक पवार यांच्या पॅनेलमध्ये अटीतटीची लढत रंगली होती. बाजार समितीच्या १८ संचालकपदांसाठी ५ जुलै रोजी मतदान होणार होते. ग्रामपंचायत मतदारसंघाच्या मतदार यादीत शिरूर तालुक्यातील ९६ ग्रामपंचायतींपैकी ७८ ग्रामपंचायतींच्या सदस्यांचा समावेश करण्यात आला नव्हता. त्यामुळे अनेक सदस्य मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहत असल्याचा दावा करत मयूर करंजे व अन्य याचिकाकर्त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. या सदस्यांचा मतदार यादीत समावेश करण्याची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली होती. अशोक पवार यांनी सांगितले की, ग्रामपंचायत मतदारसंघात सध्या केवळ २०६ मतदारांचा समावेश होता, तर तब्बल ७८९ पात्र सदस्य मतदार यादीबाहेर राहिले होते. या सर्वांना मतदानाचा अधिकार मिळावा, यासाठी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. ग्रामपंचायत मतदारसंघातून चार संचालक निवडून द्यायचे असून, कमी मतदारसंख्येवर निवडणूक घेण्याचा प्रयत्न न्यायालयाच्या निर्णयामुळे हाणून पाडला गेला, असा दावा त्यांनी केला. पत्रकार परिषदेला भाजपचे तालुकाध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राहुल बाबुराव पाचर्णे, उपनगराध्यक्ष मितेश गादिया, याचिकाकर्ते मयूर करंजे, बाजार समितीचे माजी सभापती शंकर जांभळकर आदी उपस्थित होते.

दरम्यान, महायुती शेतकरी पॅनेलचे नेते व बाजार समितीचे माजी सभापती शशिकांत दसडे यांनीही पत्रकार परिषद घेऊन न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले. ते म्हणाले ग्रामपंचायत सदस्यांना मतदानाचा हक्क मिळावा, यासाठी यशवंत आबासाहेब गव्हाणे यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाच्या निर्णयामुळे वंचित सदस्यांना न्याय मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यासंदर्भात भाजपाचे राहुल गवारी यांनी ही हरकती नोंदविण्यासाठी पुढाकार घेतला होता. यशवंत आबासाहेब गव्हाणे यांनी यासंदर्भात न्यायालयात १९ मेला याचिका दाखल केली होती. तर मयूर करंजे यांनी २८ मे रोजी याचिका दाखल केली होती. मतदार यादी जाहिर झाल्यावर तातडीने रिट का दाखल केली नाही असा सवाल दसगुडे यांनी केला. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रवींद्र काळे, बाजार समितीचे माजी संचालक राहुल गवारी, संतोष मोरे, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष प्रदीप सोनवणे, आदी यावेळी उपस्थित होते. दरम्यान यासंदर्भात एआर ऑफिस शी संपर्क साधला असता न्यायालयाचा निर्णयाचा आदेश रात्री उशिरा पर्यत कार्यालयास प्राप्त झाला नसल्याचे सांगण्यात आले.

### उमेदवारांचा प्रचार खर्च वाया?

**निवडणुकीच्या मतदानाला अवघे दोन दिवस शिल्लक असताना न्यायालयाने संपूर्ण प्रक्रिया रद्द केल्याने उमेदवारांना मोठा धक्का बसला आहे. प्रचारासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च आणि नियोजन केलेल्या उमेदवारांचा आतापर्यंतचा खर्च व मेहनत वाया गेल्याची चर्चा सुरू आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर काही उमेदवारांमध्ये नाराजीचे, तर काहींमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.**

जागृत शोध हे साप्ताहिक मालक,प्रकाशक संपादक भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर यांनी शिवकृपा प्रिंटर्स माळीवाडा अहमदनगर येथे छापुन ,नगर – कल्याण रोड भावनाऋषी अहमदनगर ४१४००१ येथे प्रकाशित केले.सपादक – भगवान रामचंद्र श्रीमंदिलकर मो.नं.८००७०७२८२८,कार्यालय – कुंभार आळी,शिरूर,ता.शिरूर,जि.पुणे ४१२२१० jagrutshodha@gmail.com

# माध्यमिकच्या सभेत शिक्षकांची खडाजंगी



**जागृत शोध**

अहिल्यानगर प्रतिनिधी: लेखापरीक्षणात नमूद करण्यात आलेल्या १५ कोटी रुपयांच्या तफावतीच्या मुद्द्यावरून माध्यमिक शिक्षक सोसायटी च्या सभेत रविवारी पुन्हा जोरदार खडाजंगी झाली. यावेळी माईक वर बोलण्यावरून वाद निर्माण झाल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी नेत्यांसह संचालकमध्ये शाब्दिक चकमकीच्या फेरी झाल्या. दरम्यान, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना व्यासपीठावर जावे लागले. त्यामुळे काही सभासदांनी आक्षेप घेतला. त्यानंतर वातावरण शांत झाल्यावर सभा सुरळीत पार पडली.सभनंतर सत्ताधार्यांनी विरोधकांचा आवाज दाबत त्यांना बोलवण्याची संधी न देता लाईट बंद करत सभा गुंडाळ्या चा आरोप विरोध कांकडून करण्यात आला.नगर शहरातील एका मंगल कार्यालयात झालेल्या या सभेच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे होते. व्यासपीठावर उपाध्यक्ष अर्जुन वाळके, संचालक बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सुनील दानवे, राजेंद्र कोतकर, आप्पासाहेब जगताप, माजी अध्यक्ष दिलीप काटे, कल्याण ठोंबरे, सचिव स्वप्नील इथापे तसेच आजी-माजी संचालक उपस्थित होते. प्रास्ताविकात अध्यक्ष शिंदे यांनी सोसायटीच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेताना संस्थेच्या ठेवींमध्ये २० कोटी रुपयांची वाढ झाल्याचे सांगितले. कर्जमर्यादा १८ लाखांवरून २० लाख रुपये करण्यात आल्याची तसेच लेखापरीक्षकांच्या शुल्कात सुमारे ९ लाख रुपयांची बचत झाल्याची माहिती त्यांनी दिली.यावेळी सभासद वैभव सांगळे यांनी या माहितीवर आक्षेप घेत प्रश्न उपस्थित केला. यावर उत्तर देताना अध्यक्ष शिंदे म्हणाले, २५ वर्षांनंतर सत्तांतर होऊन आम्ही कारभार हाती घेतला. मात्र मागील संचालक मंडळाच्या कार्यकाळातील लेखापरीक्षणात सुमारे १५ कोटी रुपयांची तफावत नोंदविण्यात आली आहे. त्या बाबींसाठी विद्यमान संचालक मंडळ जबाबदार राहणार नाही. सभासद संतोष कानडे यांनी मागील वर्षी सोसायटीच्या नावात शिक्षक व शिक्षकेतर असा बदल करण्याचा ठराव मंजूर होऊनही त्याची अंमलबजावणी का झाली नाही, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर अध्यक्ष शिंदे यांनी, प्रथम अहमदनगरचे अधिकृत नाव बदलून अहिल्यानगर करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल, त्यानंतर पुढील बदल केले जातील, असे स्पष्ट केले. यानंतर वर्गणी वाढविण्या च्या मुद्द्यावरून पुन्हा चर्चा रंगली. काही सभासदांनी बोलण्याचा आग्रह धरताच व्यासपीठासमोर गोंधळ निर्माण झाला.

## पाबळमध्ये अतिक्रमण व नुकसान केल्या प्रकरणी गुन्हा

**जागृत शोध**

( शिक्रापूर प्रतिनिधी ) पाबळ ता. शिरुर येथे एका इसमाच्या शेतजमिनीमध्ये अतिक्रमण करुन नुकसान केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे निखील अशोक चौधरी याचे विरूद अतिक्रमण करुन नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाबळ ता. शिरुर येथे अर्जुन कंजारभाट यांनी खरेदी केलेली शेतजमीन असून अर्जुन यांनी सदर जमिनीला कंपाउंड करुन पाटी देखील लावलेली आहे, नुकतेच सदर शेतामध्ये पेरणी करायची असल्याने अर्जुन शेतात आले असताना शेतातील कंपाउंड सह कंपाउंडचे पोल व पाटी तोडून नुकसान केले असल्याचे दिसून आल्याने अर्जुन यांनी चौकशी केली तेव्हा गावातील निखील चौधरी याने ट्रॅक्टर घेऊन येऊन अनाधिकाराने शेतात प्रवेश करुन अतिक्रमण करुन नुकसान केल्याचे समोर आले, याबाबत अर्जुन लिंबा कंजारभाट वय ४३ वर्षे रा. बोऱ्हाडे वाडी मोशी ता. हवेली जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी निखील अशोक चौधरी याचे विरूद अतिक्रमण करुन नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार गणेश सुतार हे करत आहे.

# शिक्रापुरात स्वच्छता मोहिमेतून गाव चकाचक

## उपसभापतींसह पदाधिकाऱ्यांनी हाती घेतले झाडू खराटे

**जागृत शोध**

( शिक्रापूर प्रतिनिधी ) शिक्रापूर ता. शिरुर येथील कचरा प्रश्न गेली पाच वर्षांपासून प्रलंबित असताना अखेर काही महिलांनी आंदोलनचा इशारा दिला असताना पंचायत समितीचे उपसभापती यांनी पुढाकार घेत गावामध्ये स्वच्छता मोहीम राबवत गावातील कचरा हटविला असून गावातील पाच वर्षापासून प्रलंबित असलेली कचरा समस्या सोडवून ग्रामस्थांना दिलेला शब्द पूर्ण केला आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील कचरा प्रअश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित असताना काही दिवसांपूर्वी ग्रामपंचायतने सणसवाडी येथे भाड्याने घेतलेल्या गोडावूनमध्ये कचरा साठवून पुण्यात पाठविला जात होता, नुकतेच सदर गोडावून बंद झाल्याने ग्रामस्थांचा गोळा होणारा कचरा गावात इतरत्र टाकून दिला जात असल्याने सर्वत्र कचऱ्याचे मोठे ढीग साचल्याने दुर्गंधी पसरू लागल्याने नागरिक हैराण झाले, काही महिलांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला असताना उपसभापती रामभाऊ सासवडे गावामध्ये स्वच्छता अभियान राबवत कचरा हटवण्याचे जाहीर केले, त्यांनतर ३ जुलै रोजी उपसभापती रामभाऊ सासवडे, ग्रामपंचायत अधिकारी शिवाजी शिंदे, ग्रामपंचायत सदस्य कृष्णा सासवडे, मोहिनी मांढरे, शालन राऊत, युवराज मांढरे, विजय लोखंडे, मंगेश विरोळे, अशोक शहाणे, जयाभाऊ विरोळे, नाना गिलबिले, रवींद्र भुजबळ, भाऊसाहेब कापरे, सुनील चौरसिया, तेजस राऊत, अतुल सासवडे, कांतीलाल भुजबळ यांसह आदींनी १२ जेसीबी, १२ ट्रॅक्टर, ६ डंपर, ५ कचरा गाड्यांसह शंभर खराटे, झाडू, घमेले घेऊन गावात दाखल झाले दरम्यान गावात सर्वत्र साचलेले कचऱ्याचे ढीग जेसीबीच्या सहाय्याने उचलून हटवण्यात आले, दरम्यान गावातील कचऱ्यासाठी एक एकर जागा घेऊन तेथे कचरा संकलित केला करुन पुणे कचरा डेपोला पाठवला जात असल्याचे यावेळी उपसभापती रामभाऊ सासवडे यांनी सांगितले.



– शिक्रापूर ता. शिरुर येथे ग्रामस्वच्छता अभियान मध्ये सहभागी पदाधिकारी.

**पंचायत समिती निवडणूक वेळी कचरा प्रश्न सोडवण्याचा ग्रामस्थांना शब्द दिला होता, त्यानुसार आपण एक एकर जागा घेऊन तेथे कचरा संकलित करणार असताना आता सर्वत्र पूर्ववत कचरागाड्या फिरुन कचरा संकलित करणार असल्याने पुढील आठवडाभरात कचऱ्याचा प्रश्न पूर्णपणे मिटणार असल्याचे उपसभापती रामभाऊ सासवडे यांनी सांगितले.**

# नशामुक्त भारत अभियानांतर्गत येरवडा येथे जनजागृती कार्यक्रम संपन्न

## व्यसनमुक्त राहा, शिक्षणाला प्राधान्य द्या समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे

**जागृत शोध**

पुणे, (प्रतिनिधी ) - दारु व अंमली पदार्थासह समाज माध्यमांचेही व्यसन घातक असून यामुळे विद्यार्थ्यांनी अशा व्यसनांपासून दूर राहावे, येत्या काळात भारत देशाला महासत्ता म्हणून उदयास येण्याकरिता तरुण पिढीसह विद्यार्थ्यांचे मोठे योगदान आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक प्रगती करावी, असे आवाहन राज्याच्या समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे यांनी यांनी केले. नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत आंतरराष्ट्रीय मादक पदार्थाचा गैरवापर व अवैध तस्करी विरोधी दिनानिमित्त सफाई कामगारांच्या मुला-मुलींची शासकीय निवासी शाळा, येरवडा येथे जनजागृती कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे उपस्थित होत्या. यावेळी प्रादेशिक उपआयुक्त वंदना कोचुरे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राधाकिसन देवढे, सहायक आयुक्त (व्यसनमुक्ती) मिना आंबाडेकर तसेच डॉ. विजय मोरे यांच्यासह सुमारे २०० विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. वाढती व्यसनाधीनतेचे प्रमाण, त्याचे शारिरीक व आर्थिक दुष्परिणाम तसेच व्यसनांपासून दूर राहण्या साठी आवश्यक उपाययोजनां बाबत मार्गदर्शन करण्यात आले, अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी राधाकिशन देवढे यांनी दिली.






# महिलेची जबरी चोरी करून पसार झालेल्या सराईताला २४ तासांत अटक; शिरूर पोलिसांची कारवाई

**जागृत शोध**

शिरूर : कारेगाव परिसरात भंगार गोळा करणाऱ्या महिलेवर चाकूचा धाक दाखवून सुमारे ८० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लुटणाऱ्या सराईत आरोपीला एमआयडीसी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा माग काढत गुन्ह्याचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले. न्यायालयाने आरोपीला ६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संगीता परमेश्वर शिंदे (रा. ढवळगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्या नगर) या २७ जून रोजी रात्री कारेगाव येथील मजूर अड्ड्या वरून शिरूरच्या दिशेने जाण्या साठी एका कारला हात दाखवून बसल्या होत्या. प्रवासादरम्यान कारमधील अनोळखी व्यक्तीने चाकूचा धाक दाखवत त्यांच्या गळ्या तील व कानातील सुमारे ८ ग्रॅम वजनाचे, ८० हजार रुपये किमती चे सोन्याचे दागिने जबरदस्तीने काढून घेतले. त्या नंतर आरोपीने त्यांना शिरूर बायपास येथे सोडून दिले. यानंतर संगीता शिंदे या एका परिचित व्यक्तीसोबत दुचाकी वरून गावाकडे निघाल्या असताना त्यांच्या दुचाकीला टेम्पोची धडक बसली. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. मात्र, अप घाता पूर्वी त्यांनी जबरी चोरीची घटना मुलगा प्रभू परमेश्वर शिंदे याला दूरध्वनी वरून सांगितली होती. प्रभू शिंदे यांनी ही माहिती पोलीस निरीक्षक कुमार कदम यांना दिली. त्यानंतर पोलिसांनी संवेदनशील भूमिका घेत मयत महिलेच्या कुटुंबीयांना आधार देत २९ जून रोजी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा क्रमांक ३१२/ २०२६, बीएनएस कलम ३०९ (४) अन्वये जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक कुमार कदम यांनी तपास पथकाला तातडीने सूचना दिल्या. सहाय्यक फौजदार दत्तात्रय शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल उमेश कुतवळ आणि दीपक दळवी यांनी कारेगाव परिसरासह पुणे-नगर महामार्गावरील २५ ते ३० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. या तपासातून विनोद अनिल जाधव (वय ३६, रा. बाभुळसर खुर्द, ता. शिरूर) याने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली स्विफ्ट कार (एमएच १२ ईजी २५८५) आणि चाकू जप्त केला.आरोपीला ३० जून रोजी रात्री अटक करण्यात आली. प्रथमवर्ग न्यायदंडाधि काऱ्यांनी त्याला ६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध यापूर्वी अपहरण करून खून तसेच जबरी चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे (खेड विभाग, अतिरिक्त कार्यभार शिरूर) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपासात पोलीस निरीक्षक कुमार कदम, सहायक फौजदार दत्तात्रय शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल उमेश कुतवळ, योगेश गुंड, दीपक दळवी, संदीप भांड, नितीन दळवी, प्रतीक खरबज, पंडित मुंढे तसेच शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलीस कॉन्स्टेबल विजय शिंदे आणि नितेश थोरात यांनी सहभाग घेतला. पुढील तपास सहायक फौजदार दत्तात्रय शिंदे करीत आहेत.

## शेतीच्या वादातून महिलांना जातीवाचक शिवीगाळ

### शिरूर पोलीस स्टेशन मध्ये ॲट्रॉसिटी प्रकरणी तिघांवर गुन्हा

**जागृत शोध**

( शिक्रापूर प्रतिनिधी ) वडनेर खुर्द ता. शिरूर येथे शेतामध्ये काम करत असलेल्या महिलांना शेतीच्या वादातून जातीवाचक शिवीगाळ केल्याची घटना घडली असल्याने शिरूर पोलीस स्टेशन येथे रखमा शंकर निचित, संदीप प्रभाकर डेरे व ओंकार अंकुश गाडगे या तिघांवर ॲट्रॉसिटी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडनेर खुर्द ता. शिरूर येथील सुवर्णा पडवळ, मनीषा पडवळ, स्वप्नाली पडवळ व उर्मिला पडवळ या महिला त्यांच्या शेतात पेरणी करायची असल्याने शेतातील गवत वेचित असताना रखमा निचित, संदीप डेरे व ओंकार गाडगे तिघेजण सदर शेताच्या ठिकाणी आले, त्यांनी शेतीच्या वादातून शेतात काम करणाऱ्या सुवर्णा पडवळ यांसह आदी महिलांना दमदाटी करत ही शेतजमीन आमची आहे, येथे पाय ठेवायचा नाही असे म्हणून जातिवाचक शिवीगाळ करत दमदाटी केली, घडलेल्या प्रकाराबाबत सुवर्णा पिराजी पडवळ वय ४३ वर्षे रा. वडनेर खुर्द ता. शिरूर जि. पुणे यांनी शिरूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी रखमा शंकर निचित रा. वडनेर खुर्द ता. शिरूर जि. पुणे, संदीप प्रभाकर डेरे रा. बेले पाडळी ता. पारनेर जि. अहिल्यानगर व ओंकार अंकुश गाडगे रा. साकोरी ता. जुन्नर जि. पुणे या तिघांवर जातीवाचक शिवीगाळ केल्याने ॲट्रॉसिटी प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल मांडवे हे करत आहे.




# पुण्यात पावसाचा जोर वाढणार, हवामान खात्याचा रेड अलर्ट, सिंहगड पर्यटकांसाठी बंद; तर मावळमध्ये 'माळीण'ची पुनरावृत्ती, भूस्खलनात कुटुंब ढिगाऱ्याखाली गाडलं

**जागृत शोध**

भारतीय हवामान विभागान पुणे जिल्ह्यासाठी आज आणि उद्या रेड अलर्ट जारी केला असून, जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सिंहगड घाट परिसर हा दरडप्रवण (ङरपवीश्रळवश झीपश) क्षेत्र असल्यानं मुसळधार पावसामुळे दरड कोसळणं, झाडं उन्मळून पडणं, दगड घसरणं, रस्त्यावर पाणी साचणं आणि इतर नैसर्गिक आपत्ती उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिक, पर्यटकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन सिंहगड घाट परिसरातील पर्यटकांचा प्रवेश आज आणि उद्या दिनांक ६, ७ जुलै रोजी तात्पुरता बंद ठेवण्यात येणार आहे. पावसाची परिस्थिती पाहून ८ जुलैला सिंहगड किल्यावर पर्यटकांना प्रवेश द्यायचा की नाही हे ठरवण्यात येईल, असं प्रशासनानं म्हटलंय. पुढील सुचनांनंतरच वाहतूक सुरळीत करण्याबाबत विचार केला जाईल.

भारतीय हवामान विभागानं पुणे जिल्ह्यासाठी आज आणि उद्या रेड अलर्ट जारी केला असून, जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सिंहगड घाट परिसर हा दरडप्रवण (ङरपवीश्रळवश झीपश) क्षेत्र असल्यानं मुसळधार पावसामुळे दरड कोसळणं, झाडं उन्मळून पडणं, दगड घसरणं, रस्त्यावर पाणी साचणं आणि इतर नैसर्गिक आपत्ती उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिक, पर्यटकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन सिंहगड घाट परिसरातील पर्यटकांचा प्रवेश आज आणि उद्या दिनांक ६, ७ जुलै रोजी तात्पुरता बंद ठेवण्यात येणार आहे. पावसाची परिस्थिती पाहून ८ जुलैला सिंहगड किल्यावर पर्यटकांना प्रवेश द्यायचा की नाही हे ठरवण्यात येईल, असं प्रशासनानं म्हटलंय. पुढील सुचनांनंतरच वाहतूक सुरळीत करण्याबाबत विचार केला जाईल.

पुणे आणि मुंबई वाहतूक पूर्णतः ठप्प, मिसिंग लिंकवर दरड तर द्रुतगतीवर पाणीच पाणी पुणे आणि मुंबईकडे प्रवास करणाऱ्यांसाठी अत्यंत महत्वाची बातमी आहे. अतिवृष्टीमुळे पुण्याकडे आणि मुंबईकडे जाणारी वाहतूक पूर्णतः ठप्प आहे. नव्यानं खुला करण्यात आलेल्या मिसिंग लिंकवर दरड कोसळलेली आहे. आधीच्या द्रुतगती मार्गावर अमृतांजन पुलाजवळ आणि खालापूर टोल नाक्याजवळ पाणीचं पाणी साचलेलं आहे. तसेच, जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर दरड कोसळलेली आहे. त्यामुळं पुणे आणि मुंबई महामार्गावरुन प्रवास करणं आज अशक्य आहे. दुसरीकडे पुणे-मुंबई लोहमार्गावर ठाकूरवाडी परिसरात दरड कोसळली आहे. यामुळं हा पर्याय ही चाकरमान्यांसाठी बंद आहे. महामार्ग आणि लोहमार्ग हे दोन्ही मार्ग आज वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याचं पोलीस प्रशासनाकडून जाहीर करण्यात आलंय. त्यामुळं पुणे आणि मुंबई प्रवास करणाऱ्यांनी घराबाहेर न पडण्याचा सल्ला प्रशासनाने दिलाय.



पुणे-मुंबई रेल्वे मार्गावर मुसळधार पावसाचा मोठा परिणाम झाला आहे. खंडाळा ते मंकी हिल आणि ठाकूरवाडी दरम्यान रेल्वे रुळांवर अनेक ठिकाणी दगड आणि माती वाहून आल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव या मार्गावरील रेल्वे वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली आहे. परिणामी मुंबई-पुणे आणि पुणे-मुंबई मार्गावरील पाच लांब पल्ल्याच्या गाड्या रद्द करण्यात आल्याची माहिती पुणे रेल्वे विभागाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून दिली आहे. रेल्वे प्रशासनाकडून रुळांवरील माती आणि दगड हटविण्याचे युद्धपातळीवर काम सुरू असून, प्रवाशांनी घराबाहेर पडण्यापूर्वी आपल्या गाडीची अद्ययावत माहिती तपासूनच प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुण्यातील मावळ तालुक्यातील पाठण गावात दुर्दैवी घटना घडलीये. अतिवृष्टीमुळे विसापूर किल्ल्याचा एक भाग कोसळून या गावातील एक कुटुंब गाडलं गेलंय. नंदू तिकोणेंच्या कुटुंबावर काळरात्र चालून आली आहे. नंदू तिकोने, पत्नी आणि मुलगा घरात असताना काळाने घाला घातला. या तिघांचा शोध सुरु एनडीआरएफ पथकाकडून सुरुये. एकाचा मृतदेह सापडला आहे. पुणे-मुंबई मार्गावर दरड कोसळल्यामुळे, पुढील आदेश येईपर्यंत पुणे-मुंबई दरम्यानची सर्व एसटी बस वाहतूक बंद करण्यात आली आहे. सकाळी पुण्याहून मुंबईसाठी निघालेल्या ४ एसटी बसेस 'उर्से टोल नाका' परिसरात अडकल्या होत्या, त्यांना सुरक्षितपणे पुन्हा पुण्यात माघारी बोलावण्यात आले आहे. कृपया प्रवाशांनी सहकार्य करावे आणि रस्ता मोकळा होईपर्यंत प्रवासाचे नियोजन करू नये, अशी माहिती एसटी पुणे विभागाचे वाहतूक अधिकारी कमलेश धनराळे यांनी दिलीय.

पुणे-महाड महामार्गावर दरड कोसळली असून त्यामुळे वरंधा घाटातून होणारी वाहतूक पुर्णपणे ठप्प झालीय. वरंधा घाटात ४ ते ५ ठिकाणी दरडी कोसळून वाहतूक पूर्णपणे ठप्प झालीय. पुणे जिल्ह्यातील घाट माथ्यावर रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे वरंधा घाटातील वारवंड ते उंबर्डेवाडी दरम्यान ४ ते ५ ठिकाणी दरडी कोसळल्या आहेत. त्यामुळे या पुणे भोर महाड मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. याचा भागांत जवपास २०० मिलिमीटरहून अधिक पावसाची नोंद झाली आहे. प्रशासनाकडून युद्धपातळीवर दरड हटविण्याचं काम सुरू आहे.

# मानखुर्दमध्ये तीन मजली चाळीचा भाग कोसळून सहा जणांचा मृत्यू; ५ बालकांसह एका महिलेचा समावेश

**जागृत शोध**

मुंबई :गेल्या सहा दिवसांपासून मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, विविध भागांत भीषण दुर्घटना घडल्या आहेत. मुंबईत (चींीलरळ) आतापर्यंत वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये १२ जणांचा मृत्यू झाला आहे. चेंबूर, कुर्ला आणि मानखुर्द या भागांना पावसाचा मोठा फटका बसला असून, मानखुर्द येथे रविवार (दि.०५) रोजी एक दुर्दैवी घटना घडली आहे. मानखुर्दच्या जनतानगर परिसरात तीन मजली चाळीचा भाग कोसळून ५ निष्पाप बालक आणि एक महिला अशा ६ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर १ जण गंभीर जखमी झाला आहे.रविवारी रात्री नेमकं काय घडलं ?मुंबईतील मानखुर्द येथील जनतानगर परिसरात हनुमान मंदिराजवळ (चाळ क्रमांक ५) रविवारी (५ जुलै २०२६) रात्री साडेआठच्या सुमारास ही घटना घडली. येथील तळमजला अधिक तीन मजले असलेल्या कच्च्या



चाळीतील २ ते ३ घरे अचानक पत्त्यासारखी कोसळली. रविवारची रात्र असल्याने सर्व रहिवासी घरातच होते, ज्यामुळे अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले होते.युद्धपातळीवर बचावकार्य करण्यात आले घटनेची माहिती मिळताच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (छऊठऋ), मुंबई अग्निशमन दल, स्थानिक पोलीस, महानगरपालिकेचे कर्मचारी आणि १०८ रुग्णवाहिका तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. स्थानिक नगरसेवक नवनाथ बन यांनी स्वतः उपस्थित राहून बचावकार्याचे समन्वयन केले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांना युद्धपातळीवर बाहेर काढून तात्काळ गोवंडी येथील 'पंडित मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालय' आणि घाटकोपरच्या 'राजावाडी रुग्णालयात' दाखल करण्यात आले.५ बालकांसह ६ जणांचा मृत्यू रुग्णालयातील डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, शताब्दी रुग्णालयात आणलेल्या एका महिलेला, ३ लहान मुलींना आणि १ लहान मुलाला मृत घोषित करण्यात आले. तसेच, राजावाडी रुग्णालयात आणखी एका लहान मुलाला मृत आणले गेले होते. या दुर्घटनेत एका तरुणाला गंभीर दुखापत झाली असून त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.महापौर आणि मंत्र्यांची घटनास्थळी भेट या भीषण दुर्घटनेची माहिती मिळताच प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली होती. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी तातडीने गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयात जाऊन मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेतली, त्यांचे सांत्वन केले व धीर दिला. यावेळी त्यांच्यासोबत आमदार अबू आझमी आणि रुक्साना सिद्दिकी देखील उपस्थित होते. महापौरांनी प्रशासनाला तातडीने सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत, ङ्गमुंबईतील अशा सर्व धोकादायक इमारतींची आणि कच्च्या बांधकामांची कसून चौकशी केली जाईल,ङ्ग अशी माहिती त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली होती.

# शिक्रापूर तळेगाव रस्त्यावर ट्रक उलटला

**ट्रक सह मशीनचे मोठे नुकसान / सुदैवाने कोणतीही हानी नाही**



**जागृत शोध**

( शिक्रापूर प्रतिनिधी ) शिक्रापूर ता. शिरुर येथील शिक्रापूर न्हावरा रस्ताचे काम सुरु असताना अनेक अपघात व वाहने उलटण्याच्या घटना घडत असताना नुकतेच एका कंपनीची मशीन घेऊन जाणारा ट्रक उलटला असून सुदैवाने कोणतीही हानी झाली नसून ट्रक व मशीनचे मोठे नुकसान झालेआहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील शिक्रापूर तळेगाव रस्त्याने एम एच १२ एफ झेड ४०४५ हा ट्रक चाकण येथील एका कंपनीची मशीन घेऊन श्रीगोंदा येथे चाललेला असताना शिक्रापूर येथे सुरु असलेल्या रस्त्याचे कामाच्या ठिकाणी मशीन हलल्याने ट्रक अचानक उलटला दरम्यान ट्रक चालक सचिन नाना भिसे वय २६ वर्षे रा. वांगदरी ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर हा किरकोळ जखमी होऊन सुदैवाने बचावला, घटनेची माहिती मिळताच पोलीस हवालदार मिलिंद देवरे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता ट्रक व मशीनचे मोठे नुकसान झाल्याचे दिसून आले, यावेळी क्रेनच्या मदतीने ट्रक सरळ करुन बाजूला घेण्यात आला, तर सध्या रस्त्याचे काम सुरु असल्याने वाहन चालकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील शिक्रापूर तळेगाव रस्त्यावर उलटलेला ट्रक.

